
|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet
Containing periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869



गुढीपाडवा अभीष्टचिंतन!

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

❁ वर्ष २२ वे, अंक १ ❁
दि. १५ मार्च २०२२ ❁ किंमत रु. २०/-

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

**✻ अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

**✻ उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्स्प्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

**✻ कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

**✻ सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

**✻ कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

**✻ वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

आशिष राम देवधर (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

**✻ सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

**✻ सभासद**

**श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

**संजय सुधाकर देवधर** (कु. वृ. पान ४९१/१७७९)
ए/४२, अनुभव कॉम्प्लेक्स, स्नेह पॅराडाईज, एम.आय.टी कॉलज रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
मोबाईल : ९८२३०७३३११

**श्री. समीर सुरेश देवधर** (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

**श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

**कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

**श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

**✻ मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार,

मार्च महिना सुरू झाला. थंडीचा कडाका कमी होऊ लागला आहे. परंतु रशिया व युक्रेन युद्धामुळे एकंदरीत गरमी वाढू लागली आहे.

युक्रेन व रशिया यांच्यातील युद्ध सुरू होऊन आता पंधरा दिवस उलटून गेले आहेत. इंधनाच्या किमती वाढत आहेत, परिणामी महागाई वाढत आहे.

साधारणत: वीस हजार पेक्षा जास्त भारतीय विद्यार्थी, आय.टी. आणि इतर क्षेत्रातील कर्मचारी युक्रेनमध्ये अडकले आहेत. केंद्र सरकार त्यांना सुखरूप मायदेशी परत आणण्यासाठी अथक प्रयत्न करीत होते व आहेच. त्यांच्यासाठी पाठविलेल्या खास विमानांमधून हे भारतीय नागरिक स्वगृही परतत आहेत.

''हे युद्ध लवकरात लवकर संपू दे'' अशी प्रार्थना करू या.

आता कोरोना संसर्गाचा जोर ओसरल्यामुळे मुंबई-पुण्यासह बहुतेक सर्व ठिकाणी निर्बंध मोठ्या प्रमाणात शिथिल झाले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम संबंधित हॉलच्या पन्नास टक्के क्षमतेत घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे मंडळाने आयोजित केलेला वर्धापनदिनाचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे दि. १४ व १५ मे २०२२ रोजी 'स्वामीकृपा हॉल', पुणे येथे संपन्न होईल अशी आशा करू या.

वर्धापनदिनानिमित्त नेहेमीप्रमाणे एक स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार आहे. त्याची तयारी सुरू आहे. त्यासाठी काही जाहिराती आल्या आहेत. आपल्या सभासदांपैकी अनेक जण छोटे-मोठे व्यवसाय करतात. त्यांनी आपल्या उद्योग व्यवसायाची जाहिरात लवकरात लवकर श्री. संजय देवधर, पुणे (मोबाईल ९८२३०७३३११) यांच्याकडे पाठवावी. त्यामुळे आपल्या व्यवसायाची माहिती आपल्या सभासदांना मिळेल आणि आपला व्यवसाय वृद्धिंगत होईल. आपणही आपल्या सभासदांच्या व्यवसायाला हातभार लावू या. तसेच जाहिरातीच्या शुल्कामुळे मंडळाला आर्थिक साहाय्य मिळेल व त्याचा उपयोग आपल्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी अधिक चांगला होऊ शकेल. मला विश्वास आहे कीय या सूचनेचा विचार प्रत्यक्षात आणण्यास आपले सहकार्य मिळेल.

या संमेलनात नेहमीप्रमाणे जीवनगौरव पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या सभासदांचाही सत्कार करण्यात येणार आहे. तसेच 'लकी ड्रॉ', परस्पर परिचय, आपल्या कलागुणांना वाव देणारा 'विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रम' सुद्धा होणार आहे.

वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचे सत्कार तसेच विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या उपस्थित दांपत्यांचा सत्कारही होणार आहे. दहावी, बारावी, पदवी, पदविका तसेच विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी त्यांनी स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे.

पान ५ वर

# देवधर मंडळ

## ❊ वार्षिक स्नेहसंमेलन २०२२ ❊

नमस्कार,

आपल्या मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन १४ व १५ मे २०२२ (शनिवार – रविवार) रोजी 'स्वामी कृपा हॉल' कर्वे रोड, पुणे येथे आयोजित केले आहे.

### ❊ स्नेहसंमेलनाची रूपरेषा ❊

**शनिवार, १४ मे :**

| | |
|---|---|
| दुपारी ४.०० ते ४.३० | : स्वागत, नोंदणी, चहा |
| दुपारी ४.३० ते ८.०० | : सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री ८.०० ते ९.०० | : भोजन |

**रविवार, १५ मे**

कार्यक्रमाची वेळ सकाळी ८.३० ते दुपारी ४.००

| | |
|---|---|
| सकाळी ८.३० ते ९.३० | : स्वागत, नोंदणी, नाश्ता |
| सकाळी ९.३० ते १.३० | : स्नेहसंमेलन |
| दुपारी १.३० ते २.३० | : स्नेहभोजन |
| दुपारी २.३० ते ४.०० | : परस्पर परिचय |
| दुपारी ४.०० | : चहापान व समारोप |

**स्नेहसंमेलनाची सविस्तर रूपरेषा**

❊ केशवराज पूजन व आरती. दीपप्रज्वलन, स्वागतगीत

❊ प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, परिचय, स्मरणिका प्रकाशन

❊ मंडळाच्या गेल्या ५४ वर्षातील वाटचाल संदर्भात फिल्म शो

❊ विशेष कार्य – कर्तृत्वाबद्दल पुरस्कार वितरण

❊ वयाची ७५ वर्षे/ १०० वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा सत्कार

❊ विवाहास पन्नास वर्षे पूर्ण केलेल्या सभासद जोडप्यांचा सत्कार

❊ विशेष कर्तुत्ववान कुलबंधु–भगिनींचा गौरव

❊ प्रमुख पाहुण्यांचे मनोगत

❊ अध्यक्षांचे मनोगत

❊ आभार

❊ पसायदान

***

या वर्षी हे स्नेहसंमेलन सशुल्क असणार आहे. शुल्क रु. ५००/– फक्त. कृपया याची नोंद घ्यावी. आपली नावे नोंदवून शुल्क कार्यकारिणी सभासदांकडे जमा करावे. बँक ट्रान्स्फर करूनही शुल्क जमा करू शकता. (शुल्क जमा करून नाव नोंदणी करण्याची तारीख २५ एप्रिल २०२२ पर्यंत आहे.).

**विशेष टीप :** ज्या सदस्यांना दि. १४ मे रोजी हॉलवर राहण्याची सुविधा हवी असेल त्यांनी श्री. संजय देवधर, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

जास्तीत जास्त संख्येने स्नेहसंमेलनात सहभागी होऊन आपला आनंद सहस्त्रपटीने वाढवूया.

आपले स्नेहांकित

**मंडळाचे पदाधिकारी व सदस्य**

***

## ✻ स्मरणिका ✻

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही स्मरणिका काढणार आहोत. या स्मरणिकेसाठी 'युवा – प्रेरणा' ही मध्यवर्ती कल्पना (थीम) आहे. संमेलन जानेवारी मध्ये करण्याच्या दृष्टीने त्यासाठी उत्तमोत्तम लेख आले आहेत. त्यामुळे नवीन लेख मागविणे आता बंद केले आहे.

तसेच स्मरणिकेसाठी जाहिरातीही मिळवून द्याव्यात. ज्यांना जाहिराती मिळविणे शक्य नसेल त्यांनी पृष्ठ प्रायोजिकत्व घ्यावे. त्यासाठी देणगीमूल्य रु. ३००/– फक्त आहे.

आपल्या उत्पादक / उद्योजक कुलबांधवांसाठी 'स्टॉल्स' उपलब्ध आहेत. त्यासाठी नाममात्र भाडे रु. ५००/– आकारले जाईल. (दोन्ही दिवसांसाठी मिळून)

स्नेहसंमेलनासाठी अधिक माहिती – तपशीलासाठी कार्यकारिणीच्या सभासदांशी संपर्क साधावा.

चला तर, २०२२ या नवीन वर्षाची सुरुवात मंडळाचे स्नेहसंमेलन उत्तम रितीने संपन्न करुया. २०२२ हे वर्ष आपणासाठी आरोग्यदायी, सुखासमाधानाचे, ऐश्वर्यसंपन्न होण्यासाठी श्री केशवराजचरणी प्रार्थना!

देवधर मंडळाच्या बँकांचा तपशील

Account- Deodhar Mandal Madhyavarti

Bank of Maharashtra
Branch- Patharli Dombivali East
IFSC MAHB0000536
AC No 60023916021

IDBI BANK , Kalyan
Deodhar Mandal Madhyavarti
Saving account no : 45310010007645

IFSC : IBKL0000456

पान ३ वरून

यंदाचे संमेलन हे मे महिन्यात होणार असल्याने सर्व परीक्षा झालेल्या असतील. त्यामुळे जास्तीत जास्त सभासदांनी नोंदणी करून या आनंद मेळाव्यात सहभागी व्हावे असा आग्रह आहे.

गुढीपाडवा व नूतन हिंदू वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

नेहमीप्रमाणे एप्रिल-मे महिन्यात येणाऱ्या आंब्याच्या सीझनसाठी व सर्व शुभकार्यांसाठी हार्दिक शुभेच्छा!

***



## ✻ यंदाचे पुरस्काराचे मानकरी ✻

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मंडळातर्फे पुरस्कार दिले जाणार असून यंदाचे मानकरी आहेत...

✻ जीवन गौरव पुरस्कार
मानकरी – श्री. नरेश दीक्षित, डोंबिवली

✻ वि. शं. देवधर स्मृति गौरव पुरस्कार
(समाजसेवी सभासद)
आदिती देवधर

✻ कमळाबाई केशव देवधर पुरस्कार
(शैक्षणिक कार्य)
श्री. संदीप देवधर, पुणे

✻ सौ. नलिनी मनोहर देवधर
(विशेष गौरव पुरस्कार)
श्रीमती अनुराधा दीक्षित

# नभः स्पृशं दीप्तम् ......

– प्रवर देशपांडे

*कारगिल युद्धापासून ते दहशतवाद्यांवरील सर्जिकल स्ट्राईकपर्यंत भारतीय वायूदलात देशसेवा बजाविलेल्या गृप कॅप्टन (निवृत्त) विनायक देवधर यांच्याविषयी...*

नभः स्पृश दीप्तमनंकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ।।

वरील भगवद्गीतेतील श्लोक म्हणजे भारतीय वायूसेनेचे नभ : स्पृशं दीप्तम् हे ब्रीदवाक्य. गर्व आणि अभिमानाने आकाशाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य भारतीय वायूदलात आहे. कारण, भारतीय वायूदलात लढवय्ये भारतीय आहेत. त्यापैकीच एक नाशिक निवासी श्री. विनायक देवधर.



इंदूरला जन्मलेल्या देवधर यांचे शिक्षण अकोला येथे झाले. त्यानंतर अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांनी १९७८ साली नागपूर विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी ही पदवी प्राप्त केली. त्या वेळी त्यांना शासकीय विद्युत विभागात नोकरी चालून आलेली असतांना देखील त्यांनी भारतीय वायूदलात दाखल होण्यासाठी तयारी सुरू केली. अखेरीस सर्व परीक्षा व मुलाखत उत्तीर्ण होऊन १९७९ मध्ये ते भारतीय वायूसेनेत (भावासे) पायलट ऑफिसर या हुद्द्यावर देशसेवेत रुजू झाले. आपले शेजारी हे भावासेमध्ये आहेत, तेव्हा त्यांचे अनुभव ऐकून देवधर यांना देखील भावासेमध्ये कमिशन घेण्याची इच्छा जागृत झाली व तेच ध्येय त्यांनी ठेवले.

भारतीय वायूसेनेमध्ये संपूर्ण भारतभर वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या विमानांवर, क्षेपणास्त्रांवर व दूरसंचार प्रणालीवर कार्य करण्याची संधी देवधर यांना प्राप्त झाली. त्याचप्रमाणे शिलाँग येथे असलेल्या पूर्व वायू कमांड, त्याचबरोबर दिल्ली येथे वायूसेनेच्या मुख्यालयात देखील देवधर यांनी सेवा बजावली. अखेरीस एअर फोर्स स्टेशन नैनिताल येथून स्टेशन कमांडर म्हणून गृप कॅप्टन या हुद्द्यावर २००७ मध्ये ते निवृत्त झाले. त्यांना या प्रवासात बऱ्याच वेगवेगळ्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले. मात्र, जीवनातील दोन लक्षणीय प्रसंग त्यांच्या चिरकाल स्मरणात राहणारे आहेत. ते म्हणजे भारतीय वायूसेनेला हवेतून जमिनीवरच्या रडावर मारा करण्यासाठी क्षेपणास्त्रे हवी होती. त्यासाठी तयार केलेल्या समितीमध्ये देवधर यांची नियुक्ती करण्यात आली होती. या विषयात बरेच काम केल्यानंतर आपण इस्त्रायलकडूनही क्षेपणास्त्रे विकत घेतली. त्याकरिता देवधर यांना इस्त्रायलचे बरेचदा दौरे करावे लागले आणि दुसरा प्रसंग म्हणजे कारगिल युद्धात आपल्याला विमानांत व अत्यंत भेदक अशा विमानातून मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांचा वापर करावा लागणार याची वायूसेनेला खात्री होती. त्यामुळे वायूसेनेच्या मुख्यालयात एक विशेष गट तयार करण्यात आला. त्यात सक्रिय सहभाग असल्याचा अभिमान असल्याचे देवधर

सांगतात. तसेच बालाकोट येथे झालेल्या सर्जिकल स्ट्राईकमध्ये वापरण्यात आलेल्या मिराज – मिसाईल गाइडेड विमान बेसकॅम्पचे देवधर हे प्रमुख होते.

भारतीय वायूदल हे इतर देशांपेक्षा फारच वेगळं आहे. येथे जे काही उपलब्ध आहे, त्याचा वापर करून आपण जिंकू शकतो, यावर इथे विश्वास ठेवला जातो व तशीच शिकवणसुद्धा मिळते. त्यामुळेच १९६५ व १९७१ मध्ये आपण पाकिस्तानवर, जुनी शस्त्रास्त्रे असूनदेखील विजय मिळवू शकलो असे देवधर सांगतात.

आत्मनिर्भर भारत या योजनेचा वायूसेनेला फारच उपयोग होताना दिसतो. तेजस हे भारतीय बनावटीचे लढाऊ विमान आता रशियन बनावटीच्या मिग विमानांच्याऐवजी मोठ्या प्रमाणात वापरले जाते. भारतीय बनावटीची हेलिकॉप्टर्ससुद्धा वायूसेनेत दाखल झालेली आहेत. डीआरडीओने विकसित केलेली क्षेपणास्त्रे आता आपली वायूसेना वापरत आहे. ज्या ठिकाणी शक्य आहे, अशा सर्व ठिकाणी भारतीय बनावटीचे सामान भारतीय वायूदल वापरताना दिसते. याचा मुख्य व खूप मोठा फायदा म्हणजेच कुठल्याही कारणासाठी आपल्याला इतर देशांवर विसंबून राहवे लागत नाही व पैशांचीही बचत होते असल्याचे देवधर आवर्जून नमूद करतात.

भारतीय वायूसेना इतर देशांच्या तुलनेत खूपच वेगळी आहे. अमेरिका व युरोपियन देशात त्यांचे वायूदल फक्त 'फर्स्ट लाईन मेंटेनन्स' (देखभाग अथवा दुरुस्ती) करतात. कारण, विमान तयार करणाऱ्या कंपन्या बाकी सर्व तऱ्हेचे 'मेंटेनन्स करतात. पण, आपल्याकडे विमानाचा संपूर्ण मेंट वायूदलालाच करावा लागतो. भारतीय वायूदलात सर्व तऱ्हेचे प्रशिक्षण अत्यंत उत्तम प्रकारे दिले जाते. कुठल्याही प्रसंगाला सामोरे जायला आपल्या देशाचे वायूदल सदैव तत्पर असल्याचा विश्वास देवधर व्यक्त करतात.

भारतीय सैन्यदलात व विशेष करून भारतीय वायूदलात सामील होण्यासाठी युवकांनी नक्कीच प्रयत्न करावेत. आपल्या मातृभूमीची सेवा करता येणे यासारखे दुसरे कोणतेही चांगले भाग्य होऊच शकत नसल्याची भावना ते बोलून दाखवितात.

राष्ट्रसुरक्षा सेवेत असणारी सर्वच सुरक्षा दले हे उत्तम कामगिरी करत आहेत, म्हणूनच भारतात शांतता आहे. मात्र, वायूसेनेच्या ब्रीदवाक्याला साजेसा असा गर्व आणि अभिमान बाळगत आकाशाला गवसणी घालण्याचे हे कार्य देवधर यांनी केले आहे. त्यांना शुभेच्छा!

*(दै. तरुण भारत मधून साभार)*

***

## देवधर मंडळ – वाटचाल जाहिराती

आपले त्रैमासिक, 'वाटचाल' सर्व कुलबंधू भगिनींना नित्यनेमाने आपली प्रगतीची वाटचाल कळवित असते. हे त्रैमासिक रंगीत अधिकाधिक, वाचनीय आणि संग्राह्य होत आहे.

आता यात आपल्या उद्योग, व्यवसाय याची माहिति जाहिराती द्वारे देता येईल. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. आपण यास भरभरून प्रतिसाद द्यावा ही विनंती.

**✻ जाहिरातींचे दरपत्रक ✻**

१/४ पान रुपये १००/-

१/२ पान रुपये २००/-

पूर्ण पान रुपये ४००/-

यात शुभेच्छा जाहिराती सुद्धा देता येतील.

# कहाणी आमच्या वेगळ्या वाटेची

**– हेमंत देवधर, दापोली**

साखळोलीच्या घराला २५ वर्ष झाली. मोठा पल्ला गाठला. हा प्रवास कसा झाला कळलंच नाही. १९९५ साली जमीन खरेदी करून घर बांधायला सुरुवात केली. १९९७ च्या जानेवारी महिन्यात २९ तारखेला वास्तुशांत केली. नंतर आंबा आणि काजूची लागवड केली. आज झाडं मोठी झाली आहेत.

लागवड केली त्या वेळी एक महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय घेतला. मुंबई सोडून कोकणात जाण्याचा. त्या वेळेला सर्व स्तरावर फारच विरोध झाला. सर्वांनी वेड्यात काढलं. (सर्व लोक कोकणातून मुंबईत येतात आणि मी कोकणात जातो म्हणून.) २००० साली मी चांगल्या पगाराच्या नोकरीतून सेवानिवृत्ती घेतली आणि २००२ साली माझ्या बागेवरच्या घरी राहायला आलो.

इथे आलो त्या वेळेला बागेवरच्या घरात वीजही नव्हती. कंदील आणि मेणबत्तीच्या प्रकाशात एक वर्ष राहिलो. वीज २००३ च्या मे महिन्यात जोडली गेली. पाण्याचीही व्यवस्था नव्हती. विहीर खणली होती. त्यातून पाणी उपसून, डोक्यावर कळशी घेऊन, डोंगर चढून वर घरी आणावं लागत असे. काहीही लागलं तरी कमीतकमी ५ कि.मी. दुरून आणावं लागत असे. (मुंबईत या कशाचीही सवय नव्हती.) तरी सर्व निभावून नेलं. स्वैपाक (जेवण) स्वतः बनवावं लागत असे. सगळ्या वस्तू आठवणीने आणाव्या लागत असत.

मी तिथे गेल्यावर पुढच्या वर्षी मुलाला (नभ्सला) शाळेसाठी दापोलीला आणलं. ए. जी. हायस्कूल या जुन्या आणि प्रसिद्ध शाळेत त्याला ८ वी मध्ये प्रवेश घेतला. बागेतून शाळेत जायला १२ कि. मी. अंतर आहे. ते फारच गैरसोयीचं असल्याने जालगावमध्ये एक ब्लॉक घेतला. ३० जुलै २००३ रोजी तिथे राहायला गेलो.

२००४ च्या जून महिन्यात सौ. निलिमा मुंबई सोडून जालगावात राहायला आली. अशा प्रकारे आम्ही तिघेही मुंबई सोडून आलो. मग नभ्सच्या शाळेच्या सुट्टीनुसार आम्ही बागेवर राहायला जाण्याच्या वेळा बदलल्या. सुरुवातीला मी फेब्रुवारी महिन्यापासून आणि निलिमा एप्रिल महिन्यात येत असे. (काजूचा हंगाम साधारण सुरू होण्याच्या वेळेस आम्ही तिथे पाहिजे या हिशोबाने.) नभ्स थोडा मोठा झाल्यावर मी आणि निलिमा दोघेही नभ्सची जेवणाची सोय

www.deodharmandal1968.org
या आपल्या वेबसाईटला अवश्य भेट द्या

करून पूर्ण हंगाम बागेवर राहू लागलो. आम्ही दोघेही काजू जमवायचं काम करत असू. शाळेला उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाल्यानंतर नभूसही बागेवर येत असे. मग तिघेही काजू जमवायचं काम करीत असू. साधारण या कामात संध्याकाळपर्यंत वेळ द्यावा लागे. काजूचं काम तीन टप्प्यात करावं लागे. प्रथम बोंडासहीत काजू बागेत फिरून गोळा करून ते एके ठिकाणी ढीग करून ठेवणे. नंतर बोंडे आणि बिया वेगळ्या करून बोंडे टाकून देणे. बिया धूवून त्या वाळत घालणे. तीन दिवस उन्हात वाळल्येला बिया पोत्यात(३० कि.) भरून ठेवणे.

काजूच्या शेवटी आंब्याचा हंगाम सुरू होतो. परंतु योग्य आंबे उतरवून त्याची वर्गवारी करून पेट्या भरण्याचं काम करायला गडी माणसं येत असत. त्यांनी भरलेल्या पेट्या मुंबई आणि पुण्याला न्यायचं काम मी आणि नभूस करीत असू.

या तीन चार महिन्यात घरच्यासाठी लोणची, मुरांबे, बटाट्याचा कीस वगैरे आम्ही करत असू. उन्हाळ्यात आम्हाला भेटायला नातेवाईक, मित्रमंडळी आणि जवळपास बागा असणारे लोकही यायचे. आम्ही करत असलेले लोणची, मुरांबे, बटाट्याचा कीस वगैरे ''आमच्यासाठीही करा'' अशी गळ घालणे सुरू झाले. आम्हीही आपलीच माणसे आहेत असे म्हणून करून देत असू. हे करून मागणाऱ्यांची संख्या वाढायला लागली. ''पैसे घ्या'' असा आग्रह सुरू झाला.

मग आम्ही विचार केला की आपण हा गृहउद्योग म्हणूनच सुरू करावा. आम्ही कोकम सरबत, अगळ, वेगवेगळी लोणची, साबुदाणा बटाटा चकली, थालीपीठ भाजणी, आंबा पोळी, हापूस आंबा मुरांबा, वगैरे मोठ्या प्रमाणावर बनविणे सुरू केलं. त्यासाठी फूड आणि ड्रगचं रजिस्ट्रेशन केलं.

अशा रितीने एक छोटासा गृहउद्योग सुरू केला. आमच्या मालाला 'देवधर यांची केशवराज उत्पादने' असं नाव दिलं.

दापोली परिसरात आंब्याचं उत्पादन उशीरा म्हणजे साधारण १५ मे नंतर येतं. त्यामुळे आंब्याला चांगला भाव मिळत नाही. म्हणून आमरसाचे डबे भरायला सुरुवात केली. आमचा गृहउद्योग छान चालला आहे. आमचा बागेवरचा वेळही छान जातो.

मुंबई सोडून आल्याचा पश्चाताप होत नाही. आम्ही चाकोरी सोडून चाललो याचा आनंदच वाटतो.

***



# शब्दकोडे

- रचनाकार : **श्री. पु. गो. देवधर,** पुणे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | X | ३ | ४ | | X | ५ |
| ६ | | X | X | ७ | | | X | ८ | |
| | X | ९ | १० | | | X | ११ | | |
| १२ | १३ | | | X | X | | १४ | | X |
| X | | X | | X | X | १५ | | X | १६ |
| १७ | | १८ | | १९ | | | X | २० | |
| | X | | X | | X | | X | | X |
| | X | X | २१ | | २२ | X | २३ | | |
| २४ | २५ | X | | X | २६ | २७ | | | X |
| २८ | | | | X | २९ | | X | X | ३० |

**आडवे शब्द :–**

१) भगवान विष्णूला शाप देणारा ऋषी २) परत ५) फणसातील गोड फळ ६) स्वभाव ८) भीती ९) राहण्याचे ठिकाण ११) चिरंतन १२) आचारी १४) तीर १५) वेदना १७) कोल्हापूरची देवी २०) धावा २१) स्थिती २३) भाल २४) नवरा २६) पृथ्वी २८) मंदिरांचे ठिकाण २९) मदनाची पत्नी ३०) प्रश्न

**उभे शब्द :–**

१) सदरा २) चांगला ३) माकड ४) स्तर/महत्व ५) भित्रा ७) मोठा भाऊ ८) खाणे ९) स्वरयंत्राचे ठिकाण १०) विष्णू ११) हेळसांड १३) नाही म्हणणे १५) लहान १६) कापणीचे हत्यार १७) विष्णू १८) शूर १९) सत्य २०) अन्यायी/एकाचीच बाजू घेणारा २१) दुसरीकडे २२) मिळकत/मालमत्ता २३) कमी २५) प्रसादाआधी दिले जाणारे पेय २७) कापसाचे (वस्त्र)

(उत्तरे इतरत्र)

# 'ऑस्टिनचे आजी-आजोबा'

**वैभव अरुण देवधर,**
ऑस्टिन, अमेरिका

'ऑस्टिनचे आजी-आजोबा'! नाव ऐकून गंमत वाटली ना? होय ऑस्टिनचेच आजी-आजोबा.

जग जसे जवळ येत चाललं आहे, तसं भारतीय माणूसही सातासमुद्रापार पोहोचला आहे. त्यात मराठी माणूसही आहेच. दाक्षिणात्य लोकांएवढी संख्या नसली, तरी भारताबाहेर मराठी लोकसंख्याही लक्षणीय आहे. गरज आहे ती या सर्व मराठी माणसांनी एकत्र येण्याची, एकत्र राहण्याची आणि ''एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'' हे प्रत्यक्षात आणण्याची. महाराष्ट्र मंडळे ठिकठिकाणी आहेत आणि प्रत्येक मंडळ आपापल्या परीने प्रयत्न करीतच असते. या सर्व मंडळांचे एकत्र असे बीएमएमही मराठी लोकांचे संमेलन आणि इतर बरेच कार्यक्रम भरवितच असते. शिकागोमध्ये असताना २०१७ च्या संक्रांत सण आणि महेश काळेंच्या गायनाच्या कार्यक्रमाला ८०० मराठी माणसांनी उपस्थिती लावली होती. गरज जाणवली ती भारताबाहेर अमेरिकेत येणाऱ्या मराठी आजी-आजोबांना एकत्र आणण्याची. SAIVA नामक एक संस्था सर्व भारतीय ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून कार्यक्रम करीत असते; पण प्रश्न असतो तो मराठी बोलण्याचा. अमेरिकेत येऊन मराठी लोकं भेटली तर आणि ती ही नियमितपणे तर किती छान वाटेल?

*मुलं आणि नातवंडांच्या ओढीने अमेरिकेत गेलेल्या आजी-आजोबांना ठराविक काळानंतर तेथे कंटाळा येतो. एकट्याने बाहेर पडणे मुष्कील असते. अमेरिकेत अनेक मराठी लोक आहेत. तेव्हा अमेरिकेत अशा मराठी आजी-आजोबांचा ग्रुप ऑस्टनस्थित वैभव देवधर यांनी तयार केला, त्यांची भेट घडवून आणली. मुळचे कल्याणचे असलेले देवधर सध्या तेथे वास्तव्यास आहेत. सदर विषयातील त्यांचे अनुभव त्यांनी वाटचालच्या वाचकांसाटी पाठविले आहेत.*

नॉर्थ कॅरोलिनामध्ये कॅरी या गावामध्ये तसा एक उपक्रम पाहिला आणि अनुभवलाही. सुचेता रुईकर, मनीषा थरवळ, श्वेता मोरे या तिघींनी मिळून असा एक उपक्रम काही वर्षांपूर्वी सुरू केला आणि तिथल्या मराठी आजी-आजोबांसाठी एक ग्रुप बनविला. मी तिथे राहत असताना आईने तो ग्रुप जॉईन केला आणि त्या ग्रुपमध्ये तिला खूपच मजा आली. नवीन मैत्रिणी झाल्या, प्रत्येक आठवड्याला नियमितपणे सगळ्यांच्या भेटी झाल्या. खेळ, गाणी, अनुभव कथन, व्यायाम, डॉक्टरांची व्याख्याने इत्यादी गोष्टी त्यात होतात. सर्व आजी आजोबा नियमितपणे एकत्र भेटतात आणि मराठी बोलतात. त्या तिघीही हे काही वर्षांपासून अव्याहत करीत आहेत, त्यांना खरंच सलाम.

अमेरिकेत प्रवासी व्हिसावर येणारे आजी आजोबा हे १८० दिवसांपर्यंत अमेरिकेत राहू शकतात. इकडे येऊन मुलगा, सून अथवा मुलगी, जावई आणि नातवंडं भेटतात हा तर एक अविस्मरणीय अनुभव असतो यात शंकाच नाही. अमेरिकेत आल्यापासून काही



वैभव देवधर मागे उभे डावीकडून दुसरे, सौ. सायली डावीकडून पहिल्या.

दिवस तर कसे निघून जातात ते कळतही नाही. घरातील सर्व मंडळी भेटली, नातवंडांबरोबर खेळले की जो आनंद मिळत असेल त्याला तर तुलनाच नसते. पण कुठेतरी मनात एक विचार सुरू असतो, की या घराबाहेर पडलो की काय करायचं? शेजारी पाजारी कोणी मराठी आहेत का? असतील तर ते बोलतात का आणि बोलले तर मराठीत बोलतात का? कुठेही जायचं तर गाडी पाहिजे. सहा महिन्यांकरिता इथे आलेले असताना इथे गाडीसाठी लायसन्स काढणे, गाडी शिकणे, इन्शुरन्स काढणे इतके सगळे सोपस्कार कोण करणार? मग आली का पंचाईत कुठे जायची? तसे उबर वगैरे पर्याय हे असतातच पण किती वेळा आणि कुठे कुठे वापरणार ते? बरं ते ही काही फार स्वस्तात असतात असेही नाही. मग थोडंसं अडकून पडल्यासारखं होतं, बरेच आजी-आजोबा म्हणतील, ''थोडंसं काय पूर्णपणे अडकून पडतो आम्ही. आणि घरातील पुढच्या पिढीवर पूर्णपणे अवलंबून असतो कुठेही बाहेर जायचे असले की.''

तर असे हे आजी-आजोबा अमेरिकेत येऊन सुद्धा, मराठीत मनमोकळ्या गप्पा मारू शकणार असतील तर? निवृत्तीनंतरही नवीन मित्रपरिवार जमवू शकणार असतील तर? आज असे किती आजी आजोबा आहेत की ज्यांना आपल्या मुलांना, नातवंडांना भेटायची खूप इच्छा असते; पण अमेरिकेत एकाकी मित्रपरिवाराविना सहा महिने राहणे जीवावर येते. ज्यांनी आयुष्यभर भारतात माणसंच माणसं पहिली त्यांना इथे अधूनमधून दिसणारी माणसं पाहून कसं काय करमणार? कोणी मराठी बोलणारे नाही, कोणी समवयस्क भेटत नाही, इतकंच काय काही ठिकाणी तर माणसंही दिसत नाहीत, मराठी माणूस दिसणं तर दूरच राहिलं आणि दिसलं तर मराठीतून बोलणं म्हणजे चमत्कारच.

तर कॅरी मधील उपक्रमातून प्रेरणा घेऊन आपण ऑस्टिन मध्येही असं काही का नाही करू शकत असा विचार एकदा मनात आला. काही लोकांशी या बाबतीत बोललो आणि काही

लोकांनी मदतीचा हात पुढे केलाही. मग नोव्हेंबर मध्ये विचार पक्का केला आणि ''ऑस्टिनचे आजी-आजोबा'' हा व्हॉट्सअॅप ग्रुप बनविला. नुकतेच ऑस्टिनमध्ये मराठी माणसांचे २ ग्रुप तयार झाले होते (२५५ + २४८ सभासद) त्या दोन्ही ग्रुपवर कल्पना मांडली आणि कोणाकोणाचे आईवडील ऑस्टिन मध्ये आहेत, अथवा येणार आहेत ही माहिती गोळा केली. साधारण चाळीसच्या आसपास नावं मिळाली. ह्या सर्वांचा मिळून एक व्हॉट्सअॅप ग्रुप तयार झाला. नवीनच ग्रुप असल्याने काही मंडळी उत्साहात होती तर काही मंडळी एकदम शांत. काही जण पटापट फॉरवर्ड करत होते तर काही स्वतः बनवलेले साहित्य/कविता आणि कला पोस्ट करत होते. वेगवेगळ्या विषयांवर अधूनमधून चर्चा होत असे आणि कधीकधी थोडेफार खटकेही उडायचे. पण सर्व सभासदांनी सामंजस्य दाखवून एकमेकांना सांभाळलं, फॉरवर्ड्स कमी झाले (लवकरच ग्रुप फॉरवर्ड मुक्तही होईल). सध्या ग्रुपमध्ये चाळीस सभासद आहेत. त्यातील बरेच जणं अजून भारतात आहेत आणि थोड्याच दिवसात अमेरिकेत येणार आहेत. एकमेकांना कधीच न पाहिलेले, न भेटलेले असे चाळीस सभासद आता बऱ्यापैकी ह्या व्हाट्सअॅप ग्रुप मध्ये स्थिरस्थावर झाले आहेत.

तीन महिने झाले ग्रुप तयार होऊन. कुठलाही नवीन ग्रुप; मग तो प्रत्यक्ष असो वा virtual, Tuckman ने सांगितल्याप्रमाणे forming , storming , norming या गोष्टी अपरिहार्य असतात. त्याप्रमाणे त्या थोड्याश्या का होईना ग्रुपमध्ये झाल्या आणि आता वेळ होती ती प्रत्यक्ष भेटी सुरू करण्याची. ऑस्टिनमधलं बेभरंवशाचं हवामान रविवारी २१ अंश सेल्सिअस पर्यंत जाणार असे पाहून २० Feb २०२२ हा दिवस भेटीसाठी सुचविला आणि पटापट काही आजी-आजोबांचा होकार आला. ऑस्टिनमध्ये इतक्या लोकांनी सार्वजनिक बागेत भेटायचं तर त्यासाठी आगाऊ बुकिंग करावे लागते, तेही डॉलर्स भरून. मग विचार केला पहिलीच भेट आहे आणि १० ते १२ जणच येणार आहेत, त्यात थंडी नसणार मग आपल्याच बॅकयार्ड मध्ये भेटलो तर? त्याप्रमाणे संध्याकाळी ४.३० ते ६ या वेळेत भेटायचे ठरवले. बॅकयार्डमध्ये खुर्च्या घेऊन बसायचे तर इतक्या खुर्च्या कुठून आणायच्या असा प्रश्न होता, मग विचार केला की प्रत्येकाने १-२ खुर्च्या सोबत आणल्या तर? तसे ग्रुपवर कळवले आणि त्याप्रमाणे सगळ्यांनीच प्रतिसाद दिला.

ठरल्याप्रमाणे ४.३० ला आजी आजोबा यायला लागले. बॅकयार्डमध्ये स्पीकरवर हळू आवाजात मराठी गाणी सुरू ठेवली होती. थोड्या अनौपचारिक गप्पा झाल्यावर रीतसर प्रत्येकाने आपापली ओळख करून दिली. पहिलीच भेट असल्याने सगळेच नवीन होते आणि कोणीच कोणाला ओळखत नव्हते. पण मराठी आजी आजोबा एकत्र भेटत आहेत तेही ऑस्टिनमध्ये हा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जाणवत होता. ओळखी होत असताना एकमेकांशी बोलणीही होत होती, किस्से अनुभव सांगितले जात होते, एकाच गावातले (पुणे, कल्याण, मुंबई, वर्धा इत्यादी) लोकं इथे येऊन भेटत होते त्यामुळे आणखीनच मज्जा येत होती. श्रीकांत लाळे यांनी ते मेक्सिकोमार्गे आणि केतकी कापरेकर यांनी त्या कतारमार्गे ऑस्टिनला कसे आले तो अनुभव थोडक्यात कथन केला. covid च्या काळात

पान ३ वर

# हार्दिक अभिनंदन

## कु. वरदा केयुर देवधर

वांगणी येथे राहणाऱ्या आदित्य फराड या युवकाने बनविलेल्या पाऊली या शॉर्ट फिल्म ला नुकतेच दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये बेस्ट शॉर्ट फिल्म पुरस्काराने गौरविण्यात आले.




या फिल्ममध्ये डोंबिवली येथे राहणारी आपली एक छोटी कुलभगिनी कु. वरदा केयूर देवधर हिने अभिनय केला आहे.

असं म्हटलं जातं की जिथे अंधश्रद्धा आहे, तिथे शिक्षण असू शकत नाही. आणि जिथे शिक्षण आहे, तेथे अंधश्रद्धा टिकत नाही. अंधश्रद्धेचं निर्मूलन करायचे असेल तर शिक्षण हा घटक खूप महत्त्वाचा मानला जातो. अंधश्रद्धेमुळे सुरू होणारा शिक्षणाचा प्रवास म्हणजे पाऊली फिल्म आहे. या चित्रपटात कु. वरदा हिने पाऊलीच्या मैत्रिणीची भूमिका साकारली आहे.

कु. वरदा ही इयत्ता तिसरी मध्ये डोंबिवली येथील विद्यानिकेतन शाळेत शिकत असून तिला अभिनयाची खूप आवड आहे. यंदाच्या महाराष्ट्र राज्य होशी नाट्य स्पर्धेतील काऊंटडाऊन या नाटकातही तिचा सहभाग होता. सध्या ती अभिनयाचे शिक्षण डोंबिवली येथील वेद ॲक्टिंग ॲकॅडमी येथे घेत असल्याची माहिती तिची आई सौ. शिल्पा यांनी दिली.

कु. वरदाचे मनापासून अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी देवधर मंडळातर्फे हार्दिक शुभेच्छा!



## आदित्य रमेश देवधर

पुणे येथील आदित्य रमेश देवधर यांच्या कार्याची नोंद Industry Outlook Magazine या जगविख्यात नियतकालिकाने घेतली असून, सदर अंकाच्या मुखपृष्ठावर त्यांच्या कार्याचा उल्लेख केला आहे. तसेच आतील पानांवर मुलाखतही छापण्यात आली आहे.




त्याचबरोबर Adisan Laboratories या त्यांच्या कंपनीची Veterinary Medicines manufacturer म्हणून भारतातील पहिल्या दहा कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली आहे.

श्री. आदित्य देवधर यांचे अभिनंदन! मंडळास त्यांचा सार्थ अभिमान आहे.

***

## सौ. मंजिरी समीर देवधर

सौ. मंजिरी समीर देवधर, राहणार डोंबिवली यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचा एम डी आर टी (MDRT) म्हणजेच मिलियन डॉलर राऊंड टेबल हा Insurance Industry मधील किताब सलग तिसऱ्या वर्षी मिळवला आहे.




मंजिरी समीर देवधर TATA AIA ह्या कंपनीबरोबर इन्शुरन्स सल्लागार म्हणून काम करतात. गेली सहा वर्षे सर्व प्रकारच्या गुंतवणूक व्यवसायामध्ये त्या काम करीत आहेत. मात्र आयुर्विमा व्यवसायात विशेष नैपुण्य दाखवून २०१९, २०२० आणि २०२१ या सलग तीन वर्षे त्यांनी आयुर्विमा व्यवसायातील MDRT हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा किताब मिळविला आहे. कोरोनाच्या कठीण काळात सुद्धा आपल्या कामाचे सातत्य राखत त्यांनी हे यश मिळवले आहे. त्याकरिता त्यांचे विशेष कौतुक.

आयुर्विमा व्यतिरिक्त सर्व प्रकारचे म्यच्युअल फंड, मेडिक्लेम आणि जनरल इन्शुरन्स या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. घरातल्या जबाबदाऱ्या आणि आपला व्यवसाय सांभाळून त्या चित्पावन संघ, डोंबिवली या संस्थेच्या कार्यवाह म्हणूनही गेली पाच वर्ष कार्यरत आहेत. नुकतीच ब्राह्मण महासंघ, डोंबिवली या संस्थेची कार्यकारणी सदस्य म्हणून त्यांची निवड झाली आहे.

सौ. मंजिरी यांचे मन:पूर्वक अभिनंदन!!

संपर्क : मोबाईल नं. ९८३३४८४८५७

ई मेल - manjiri06.deodhar@gmail.com

---

पान ११ वरून

भारतातून इकडे यायला बंदी असताना, १५ दिवस भारताबाहेर राहून अमेरिकेला यायचा एक मार्ग होता, तोच मार्ग यांनी निवडला होता. त्यांचे अनुभव ऐकून ज्ञानात नक्कीच भर पडली.

साबुदाणा खिचडी, आल्याची वडी, चहा, साबुदाणा वडे आणि काही आजी आजोबांनी आणलेल्या कुकीज, नारळाच्या वड्या या सगळ्याचा समाचार घेतल्यावर एक ग्रुप फोटो घेतला. तोपर्यंत ६.३० वाजून गेले होते आणि थंड वारे जाणवू लागले. थोडा अंधारही पडला तसे सगळ्यांनी आवरते घेतले ते पुन्हा भेटण्याच्या इराद्यानेच.

सर्व आजी-आजोबांना, तसेच अमोल आणि सर्व आजी-आजोबांच्या घरच्यांना ज्यांनी आजी-आजोबांना भेटीसाठी आणले त्या सर्वांना धन्यवाद.

लवकरच भेटू नवीन ठिकाणी, आजच्या आणि नवीन आजी-आजोबांसोबत.

***



# माया आणि प्रेम, एकाच नाण्याच्या दोन बाजू

**नरेश कृष्णाजी दीक्षित**, डोंबिवली(प).
मो. ९८२०४६७७४२.

यंदा मे महिन्यात (सन २०२० च्या) कोकणातून चकटफू येणारे आंबे वाहतूक व्यवस्था नसल्याने यायचे नव्हते. म्हणून येथेच मर्यादितपणे खरेदी करावे लागले; देवगड हापूस याच नावाने. असो... तर आंबे खाताखाता एकदा आम्हा उभयतांनी एकेक फोड मुलाच्या पानात वाढली. त्यातली एक फोड आमचे लक्ष नांही असे पाहून मुलाने त्याच्या बायकोच्या पानात ठेवली.

मार्च महिन्याच्या वाटचालच्या अंकात, माया आणि प्रेम- एकाच नाण्याच्या दोन बाजू या विषयावर कुलबंधुंकडून लेख मागविले होते. सहज मनात विचार आला की, हा काय प्रश्न पडावा असा विषय आहे का? माया आणि प्रेम यात काय फरक आहे? मुळात दोनही एकाच नाण्याच्या दोन बाजू. त्यामुळे हा विषय बाजूला पडला. पण १५ जूनच्या अंकात पुन्हा त्याच विषयावर लेख मागविल्याचे दिसल्याने परत विचारप्रणव झालो.

वर लिहिलेल्या आंब्याच्या फोडींची देवाणघेवाण हा विषय सुद्धा तसाच आहे. आम्ही मुलाला दिलेल्या फोडी ही माया होती तर मुलाने बायकोला गुपचूप दिलेली फोड हे प्रेम, असा विचार मनात आला. त्यामुळे लक्षात आले की माया व प्रेम ह्या जरी एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या तरी अर्थ निरनिराळा निघू शकतो. म्हणजे प्रश्न विचारणारा बरोबर आहे, असा प्रश्न असू शकतो. जरी नाणे एकच असले तरी त्याच्या दोन बाजू ह्या परस्पर दिशेला तोंड करून असतात पण आतून घट्टपणे एकत्र असतात.

चर्चा करण्यासाठी प्रथम एक 'पुरुष' हे उदाहरण घेऊया. त्याच्यावर जन्मापासून प्रेम करणारी आई-वडील, बहीण-भाऊ, आजी-आजोबा आणि इतर नातेवाईक असतात, त्यांचे प्रेम हे मायेतूनच निर्माण होते. प्रेमस्वरूप आई; वात्सल्यरूप आई किंवा वेड्याबहिणीची रे वेडी माया. पण विवाहानंतर त्याच्या आयुष्यात येणाऱ्या पत्नीचे प्रेम असावे लागते. ती त्याचेसाठी सर्व काही करते, सर्वस्व देते ते प्रेमापोटीच; भले ती माया असेल पण समाज ती त्याचे प्रेमाने सर्वकाही करते असेच म्हणतो. त्या उलट जर असे कोणी म्हणाले की त्याचे ती मायेने करते तर त्याचा अर्थ नाण्याची दुसरी बाजू प्रेम न होता दया अशी असू शकते. त्याची एखादी मैत्रीण आमची मैत्री आहे, आमच्यात मैत्रीप्रेम आहे असे म्हणाली तर ते वागवे दिसणार नाही, पण ती फक्त आमचे प्रेम आहे असे म्हणाली तर समाजाच्या भुवया उंचावतील. या उलट उदाहरणासाठी 'स्त्री' घेतली तर वरची प्रत्येक गोष्टही तिच्या बाबतीत लागू पडेल.

एखाद्याचं मूल बिघडलं किंवा आईवडिलांना विचारित नाहीसं झालं तर आईवडील आम्ही त्याच्यावर संस्कार करण्यात, माया देण्यात कमी पडलो असा विचार करतील, पण ढकलून देणार नाहीत. म्हणून माया जन्माने प्राप्त होते. पण पती-पत्नीचे बिघडले; हल्ली

केव्हाही बिघडते, (आम्हा ब्राह्मणात हा आजार फार बळावतो आहे, करोना सारखा) तर सध्याचा सोपा उपचार घटस्फोट, सहज उपलब्ध आहे, प्रेमभंग सहज होतो. नाण्याच्या दोन बाजू प्रेमभंगाच्या पाण्याने निखळतात व दोन दिशांना सहज जातात. कारण प्रेम हे निर्माण केलेले असते. त्याची वीण घट्ट-घट्ट करावयाची असते, अडथळे पार करून पुढे जायचे असते. म्हणूनच पंचवीस वर्षे संसार टिकला म्हणून सर्व कौतुक करतात आणि पन्नास वर्षे टिकला म्हणून देवधर मंडळही कौतुक करते.

मतितार्थ एव्हढाच, की माया ही जन्माने प्राप्त होते तर प्रेम हे निर्माण करावे लागते, स्वकष्टार्जित असते.

***

---

## शब्दकोड्याची उत्तरे

**आडवे शब्द :–**

१) अंबरीश ३) वापस ६) गरा ७) दानव ८) भय ९) घरदार ११) अक्षर १२) खानसामा १४) बाण १५) कळ १७) करवीरवासिनी २०) पळा २१) अवस्था २३) कपाळ २४) पती २६) वसूमती २८) तीर्थक्षेत्र २९) रती ३०) का?

**उभे शब्द :–**

१) अंगरखा २) बरा ३) वानर ४) पत ५) कायर ७) दादा ८) भक्षण ९) घसा १०) रमावर १३) नकार १४) बाळ १५) कनिष्ठ १६) विळा १७) कमलापती १८) वीर १९) वास्तव २०) पक्षपाती २१) अन्यत्र २२) स्थावर २३) कम २५) तीर्थ २७) सुती

***

---

## प्रेम आणि माया

एकाच अनमोल नाण्याच्या दोन बाजू
सर्वसमभाव दाखवू शकेल का तराजू?

माया कधी नसते आंधळी
उतरवते तारुण्याच्या मस्तीतील अफूची गोळी

प्रेमाची भाषाच आगळीवेगळी
डोळसपणे शब्दांशी खेळून नाण्याची खुलवते कळी

आईवडील बहीण भाऊ मायेचे विणतात धागे
गोकुळापरी नांदतात सोयरे सगे

पती-पत्नी प्रेमात प्रथम असते
देहसुखाला प्राधान्य
आचार, विचार, वर्तणूक, मतमतांतरे
करावी लागतात प्रेमापोटी मान्य

प्रसंगी मायेला व्हावे लागते कठोर
म्हणून कांही माया पातळ झाली असा
जीवाला लावून घेऊ नये घोर

खऱ्या प्रेमाला नाही उपमा
चुकांवर पांघरूण घालणाऱ्याला करू नये क्षमा

मायेच्या बंधनांमुळे कधी येऊ नये परावलंबित्व
वैचारिक परिपक़्वतेने खुलेल स्वतःचे व्यक्तिमत्व

प्रेमपाशात अडकून बुद्धी ठेऊ नये गहाण
कौटुंबिक स्वास्थ्य राखण्याची मनःपूर्वक असावी
जाण

माया आणि प्रेम यामध्ये नसावी कधी चुरस
तरच जाणता येईल नाण्याची नस अन नस

सरस निरस वादात हरवू नये एकत्वाचे तत्व
तरच अबाधित राहिल नाण्याचे अनमोलत्व

**पुष्पा नरेश दीक्षित**, डोंबिवली (प).
७५८८७२२९९९.


# साथीच्या रोगांची भीती बाळगणे गैर

**- डॉ. दिलीप देवधर**

*डॉ. दिलिप देवधर यांनी दि. ९ जानेवारी २०२२ रोजी समाजमाध्यमावर एक पोस्ट लिहिली होती. तो लेख संक्षिप्त स्वरूपात वाटचालच्या वाचकांसाठी*

कोणत्याही हवेतून पसरणाऱ्या विषाणूंचा आजार जगातील यच्चयावत कोणत्याही उपायाने, अगदी लॉकडाऊन, जमावबंदी, संचारबंदी या उपायाने थोपवाता येत नाही, हे उघड सत्य आहे.

आजपर्यंत फ्लूसारख्या आजाराचे निदान करण्यासाठी कधीही टेस्टिंग केले जात नव्हते. सिझनल फ्लू हा दरवर्षी येत राहणारच आहे. कोणतीही बंधनं घातली तरी फ्लूची साथ दोन ते तीन आठवडे राहतेच. ज्यांची इम्युनिटी चांगली असते, त्यांना फ्लू होऊन गेलेला कळतही नाही. सर्वांचे टेस्टिंग करण्याची आवश्यकता नसते. कोणत्याही फ्लूच्या साथीत रुग्णांचा संपर्क येणाऱ्या व न येणाऱ्या लोकांना फ्लूचा संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे एका घरात एक रुग्ण सापडला तसाच तो प्रत्येक घरात सापडण्याची शक्यता असते. म्हणून त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांना विलगीकरणात ठेवले तर संपूर्ण जगरहाटी बंद होईल. रस्त्यातून जाता येता मास्क लावल्याने कोविड होत नाही किंवा साथ पसरणार नाही हा भ्रम आहे.



आतापर्यंत मास्क लावून काळजी घेतलेल्या अनेकांना कोविड होऊन गेला आहे, हे उघड सत्य आहे. ज्यांना कोविड झाला आहे आणि त्याच्या अगदी जवळून संपर्कात येणाऱ्यांनी मास्क लावणे जरुरीचे असते.

आपल्यामुळे इतरांना कोविड होतो ही कल्पना चुकीची आहे. तसे असते, तर डॉक्टर मंडळींना रोजच कोविड झाला पाहिजे. आणि त्या भीतीने त्यांनी पेशंटही बघणं बंद केले तर काय होईल?

कोविड कोणालाही होऊ शकतो, कारण प्रत्येक जण श्वास घेतल्याशिवाय जगू शकत नाही. आपल्याला निसर्गाने आणि जन्मदात्यांकडून मिळालेली इम्युनिटी, हा एक चमत्कार आहे. नाहीतर माणसं रोजच आजारी पडली असती.

साथीमध्ये रुग्णसंख्या ही वाढणारच असते, म्हणून त्याला साथ म्हणतात. त्यामुळे पॉझिटिव्ह रुग्णांची रोजची गणती करणं आणि ती प्रसिध्द करणं यामुळे जनतेमध्ये फक्त भीती पसरते, कारण ९९% लोकं बरे होतात. पण त्याला प्रसिद्धी दिली जात नाही, हे देशाचे दुर्दैव आहे.

फ्लू प्रतिबंधक व्हॅक्सिन हे सत्तर - ऐंशी टक्के इम्युनिटी देते, आणि परत ते प्रत्येकाच्या नैसर्गिक इम्युनिटीवर अवलंबून असते.

फ्लूचा कायमचा नायनाट करण्यासाठी कधीही व्हॅक्सिन निघू शकणार नाही, हेही उघड सत्य आहे, कारण प्रत्येक वर्षी व्हायरसचा व्हेरिएंट बदलतो, हे जनतेला आता कळले आहे. हे वैद्यकीय जगतास माहिती होतेच.

फ्लूचे व्हॅक्सिन ह्या वर्षी वर्षातून तीनदा घ्यायला लागणार आहे, ह्यावरून लोकांच्या डोक्यात प्रकाश पडला पाहिजे आणि हे दरवर्षी हे तुम्ही करणार आहात का?... फ्लूचे व्हॅक्सिन फक्त ज्यांना फुफ्फुसांचा चिवट आजार आहे किंवा इतर शारीरिक आजारांमुळे ज्यांची इम्युनिटी कमी असेल

(पुढील पानावर

# 'निर्झर' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

''प्रा. सुनिल देवधर मितभाषी पण मिश्किल व्यक्तिमत्व होते. वृत्तीने ते कुटुंबवत्सल होते. उत्स्फूर्त काव्यातून ते सातत्याने व्यक्त व्हायचे. त्यांचे निर्मळ मन त्यात कायमच प्रतिबिंबित झाले. ते शरीराने आपल्यात नसले तरी निर्झर काव्यसंग्रहातून हा काव्यनिर्झर कायम झुळझुळत राहील'' असे प्रतिपादन प्रा. अनंत येवलेकर यांनी केले.

कै. प्रा. सुनिल देवधर यांच्या प्रथम जयंतीच्या औचित्याने नुकतेच 'निर्झर' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. गंगापूर रोडवरील कुसुमाग्रज स्मारकात हा समारंभ मोजक्या पन्नास निमंत्रितांच्या उपस्थितीतीत झाला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अनंत येवलेकर, प्रत्रकार संजय देवधर, प्रा. संजय जपळगावकर, शरद वर्तक व्यासपीठावर उपस्थित होते.

''सुनिलजी प्रतिभावान कवी, उत्स्फूर्त विडंबनकार, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, तळमळीचा कार्यकर्ता, आदर्श पती, प्रेमळ पिता अशा विविध रूपात नेहमीच भेटत राहिले. त्यांच्या कविता मन प्रसन्न करतात.'' अशा शब्दात श्री. संजय देवधर यांनी आपले विचार प्रकट केले.

प्रा. संजय चपळगावकर यांनी बिटको महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. प्रा. दिलिप फडके, श्री. शरद वर्तक यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्राचार्य राम कुलकर्णी यांनी ऑनलाईन अध्यक्षपद भूषविले. सुनिलजींबद्दल त्यांनी कौतुकोद्धार काढले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रमेश वाडेकर यांनी केले. डॉ. दीप देवधर यांनी आभार मानले.

---

मागील पानावरून

त्यांना वर्षातून फक्त एकदाच द्यायला पाहिजे.

वर उल्लेख केलेल्या सर्व गोष्टी आमच्या Preventive and Social Medicine या पुस्तकात दिल्या आहेत, आणि गेली ४७ वर्ष फॅमिली डॉक्टर म्हणून काम करताना यांचा मी अनुभव घेतला आहे.

२०१० साली जेव्हा स्वाईन फ्लूने भीतीचे वातावरण पसरले होते तेव्हा असं सत्य लिहिणारे माझे लेख कोणीही छापत नव्हते आणि आता तर मिडिया हाऊसेस आमच्यासारख्या डॉक्टरांचे सत्य कथन करणारे लेख छापत नाहीत ही सामाजिक शोकांतिका आहे... आणि म्हणून गेली दोन वर्षे सातत्याने फेसबुकवर लिहून समाज प्रबोधन करून समाजातील भीती घालविण्याचे अखंड काम करत आहे...

माझ्यासारखा एक सामान्य फॅमिली डॉक्टर हे एका हाती प्रयत्न करतो आहे, त्यालाच आज मूर्ख ठरविले जात आहे पण मी परत परत सांगतो –

I am proud to be fool... कारण संपूर्ण दोन वर्ष मी, माझी सून सुलक्षणा आणि माझी सहकारी डॉक्टर दीपाली शहा अखंडपणे सर्व पेशंटना अगदी कोविडच्या सुध्दा – त्यांच्याजवळ बसून, हात लावून तपासत आहोत... या शब्द व स्पर्शाने ते लवकर बरे होतात, ही वस्तुस्थिती आहे... अशा घबराट पसरविली जाणाऱ्या काळात पेशंटला भावनिक व मानसिक आधार देऊन आजाराला सामोरं जाण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणे, ही काळाची गरज आहे.

***

# यशस्वी उद्योजक सतीश देवधर

– संजय देवधर
(वरिष्ठ पत्रकार, नाशिक)

*देवधर मंडळाचे काही काळ कार्यकारिणी सदस्य असलेले, नाशिकमधील उद्योजक श्री. सतीश देवधर यांचे नुकतेच निधन झाले. ज्येष्ठ पत्रकार संजय देवधर यांनी त्यांचा थोडक्यात उलगडून दाखविलेला हा जीवनपट*

भारत पाकिस्तान फाळणी झाली आणि अनेक हिंदूंना कराची सोडावे लागले. सात वर्षांचा एक मुलगा आपली आई आणि दोन भावंडांना घेऊन कराचीहून बोटीने निघाला. प्रवासात अनंत अडचणींचा सामना करीत ते सगळे मुंबईला पोहोचले. आयुष्याच्या सुरुवातीपासून धाडसी वृत्ती अंगी बाणवली गेली. वडील शासकीय सेवेत असल्याने त्यांच्या सतत बदल्या होत. म्हणून काकांकडे राहून या युवकाने शिक्षण घेतले. पुढे नाशिकला स्वतःचा उद्योग सुरू केला व एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविला. त्यांचे नाव सतीश गोपाळ देवधर.



दि. ३० जानेवारी २०२२ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी ज्येष्ठ उद्योजक सतीश देवधर यांचे निधन झाले. नाशिकमधील अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये त्यांची आमोद एंटरप्रायझेस ही कंपनी होती. यशस्वी उद्योजक म्हणून ते सुपरिचित होते. तसेच परखड पण तितकेच प्रेमळ स्वभावाचे होते. त्यांनी अनेक व्यक्ती, संस्थांशी दृढसंबंध जोडले होते. बालपणी काका, काकू, चुलतभावंडे यांच्या प्रेमळ सहवासात त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण झाले. त्यांची सर्वात लहान चुलत बहीण त्यांच्याच वर्गात शिकत असल्याने बालपणापासून स्पर्धात्मक वृत्ती जोपासली गेली. आयुष्यातील पुढच्या काळात त्याचा त्यांना चांगला उपयोग झाला. पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांनी उत्तम गुणांनी शिक्षण पूर्ण केले. त्यांचे बरेचसे मित्र पुढील उच्चशिक्षणासाठी परदेशी जाण्याच्या तयारीत होते. सतीशजींचाही तसा प्रयत्न होता. स्वतः नोकरी करीत संध्याकाळी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ते शिकवून पैसे जमवू लागले. वडिलांचे प्रोत्साहन व थोडी आर्थिक मदत या बळावर ते १९६४ साली स्वित्झर्लंडला गेले. तेथील भारतीय व परदेशी मित्रांच्या सहवासात खिलाडू वृत्ती व मनमिळाऊ स्वभावाने ते लोकप्रिय बनले. सतीशजी त्यांच्या कुटुंबात ज्येष्ठ असल्याने त्यांना आईवडील व भावंडांच्या जबाबदारीची पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे १९६९ साली ते भारतात परत आले.

अभियांत्रिकी क्षेत्रात स्वतःचे काही निर्माण करण्याची जिद्द त्यांच्यात होती. १९८२ साली नाशिकमधील एका प्रसिद्ध कंपनीत त्यांच्यावर कामगारांकडून प्राणघातक हल्ला झाला. हा प्रसंग त्यांच्या जीवनात अक्षरशः टर्निंग पॉईंट ठरला. न डगमगता केवळ दोन वर्षात त्यांनी

स्वतःची कंपनी उभी केली. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींशी सामना करावा लागला. पण अभ्यासू वृत्ती, धाडसी स्वभाव, वक्तशीरपणा, शिस्तप्रियता या गुणांनी त्यांनी यश खेचून आणले. कंपनी मोठी करतांना कामगारांशी त्यांनी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. त्यांना योग्य मार्गदर्शन करून वेळोवेळी अडीअडचणीत आर्थिक मदतीचा हात ते पुढे करत. त्यामुळेच कामगारांना त्यांच्याबद्दल कायमच आदर, आपुलकी वाटत असे. सतीशजींना जर्मन भाषेत विशेष प्रेम, गती असल्याने नाशिकमध्ये जर्मन भाषा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यास त्यांनी पुढाकार घेतला. सुरुवातीला स्वतः शिकवण्याचेही काम केले. सिमेन्स सारख्या मल्टिनॅशनल कंपनीतील अधिकाऱ्यांशी जर्मन भाषेत संवाद साधून त्यांना आपलेसे करून घेता आले.

सतीशजींचे सामाजिक भान तीव्र होते. अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्था, संघटनांशी ते जोडले गेले होते. देवधर मंडळाशी त्यांचे ऋणानुबंध जुळले होते. २०१९ मध्ये विलेपार्ले येथे झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात त्यांना गौरविण्यात आले होते. त्यांनी वेळोवेळी आर्थिक देणग्या देण्याबरोबरच मंडळाला बळ देण्याचे काम सातत्याने केले होते. त्यांच्या पश्चात १०४ वर्षांच्या मातोश्री श्रीमती नलिनी, पत्नी आशा, मुलगी मोनिका, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतीशजींचे धाकटे बंधू व आपल्या मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. सुनील देवधर यांच्या गेल्या वर्षी झालेल्या निधनानंतर हा दुसरा धक्का आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना ! भावपूर्ण श्रद्धांजली !!

***

# आपण यांना अंतरलो

* **डॉ. अभिजित विनायक देवधर**
  मृत्यू दि. २१-१२-२०२१.
* **यशवंत दत्तात्रय दीक्षित**
  वय ७९ वर्षे, मृत्यू दि. १२-४-२०२१
* **सदाशिव दत्तात्रय दीक्षित**
  बोरिवली (प.), मुंबई, वय ८३ वर्षे
  मृत्यू दि. १२-२-२०२२
* **हरिश्चंद्र दिनकर देवधर**
  (७१६/४५४), पुणे. वय ७१ वर्षे
  मृत्यू दि. ८/३/२०२२
* **सदाशिव गजानन देवधर**
  ठाणे (पू.), मृत्यू दि. १७/३/२०२२
* **श्रीमती अंजली अनंत केतकर**

चिपळूण येथील श्रीमती अंजली अनंत केतकर (पूर्वाश्रमीच्या दुर्गा जनार्दन देवधर) यांचे नऊ फेब्रुवारी रोजी, वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले.

मूळच्या भिले येथील अंजली केतकर या चिपळूणच्या रहिवासी होत्या. त्यांनी भिले येथील पिढीजात आंब्यांचा व्यवसाय अतिशय खमकेपणानी सांभाळला. महिलांविषयी अनेक सामाजिक उपक्रमात त्या सहभागी होत असत. तसेच जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित होणाऱ्या चालण्याच्या स्पर्धेत त्यांनी अनेक वर्ष विजेतेपद मिळविले होते.

त्यांचे पश्चात दोन मुली, मुलगा, सून, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

***

**दु:खितांचे दु:खात देवधर मंडळ सहभागी आहे.**

# 'क' कोकणस्थाचा..

कोकणातील कोकणस्थ कमालीचे कष्ट करतो. काटकसरीने कमावलेल्या कपर्दीकेलाही कुरवाळतो. कण्हत कुथत कसाही कर्जाशिवाय कष्टाने कमावतो. कामाची कदर करतो.

काटकसरीपणाचे कौतुक करण्यात कंजुषी कशाला? कुहूकुहू करणारी कलमावरची कोकिळा, कोकणी कानात कुंजन करते. कथा-कादंबऱ्या काय किंवा कविकल्पना केल्या तरी कालचक्र कायमचंच.

कसा कुणास ठावूक कोकणस्थ काळजीने काळवंडला. कष्टाबरोबरच कौशल्याच्या कमतरतेचं कारण कळताच कसब कष्टाने कमावलं.

कोयीला कुरवाळता कुरवाळता कलमाचीही काळजी केली. कोयीकडून कलमापर्यंत'कनक' कमावलंच. क्रांती क्रांती करत कॉम्प्युटरची क्रेझ केली.

कालौघाबरोबरच करंटेपणा कमी कमी करत कनवटीची कपर्दीकही कलती केली. कंद, कण्या, कण्हेरीबरोबरच केकही कापले.

काटकसर, कष्ट, कुतरओढ कायमचीच. कलह, कोर्ट-कचेऱ्या, कज्जे-खटल्यांमध्ये कोमलता काळवंडली.

कोकणस्थाच्या कणखरतेचं कायमच कोमलतेला कवच. कवचाची कक्षा काढताच कोकणस्थांमधली कमतरता कळली.

कुणालाही, का रे? करण्यापेक्षा कुण्या कसबी किमयागाराची तरी कदर करावी. कोकणस्थाने क्रोध कमी करून कष्टाची काच कायम करावी.


काहीतरी करायचंय, काहीतरी कमवायचंय. कष्ट करत करत कोब्रा कट्ट्याची कल्पना कार्यरत केली. कुणासाठी कुणीतरी काहीतरी करावं.

कुणीसं करवादलं... काय? ... कसले कोब्रा ... कसला कट्टा .... कारणाशिवाय कोकलणाऱ्यांकडे कानाडोळा करावा. केळशीचा काय किंवा कोरेगावचा काय कोकणस्थाने कोकणस्थाला कट्ट्याचा केला.

काय .... काळजी कशाला?..... कष्ट करुया... कनकेश्वराची कृपा!

***

**– संकलक : वा. ना. देवधर**
जोगेश्वरी





Universal human rights council pune president

**इशा ढमढेरे यांना**

**राज्यस्तरीय भारतज्योती समाजरत्न नारी गौरव पुरस्कार २०२२ मिळाला. त्या गेले २० वर्ष सामाजिक कार्य करत आहेत; या कामाची दखल घेत हा सन्मान मिळाला आहे.**



**द आर्ट सोसायटी ऑफ इंडिया यांच्या वतीने कु. गार्गी देवधर हिला विद्यार्थी विभागात**

Ad Art Award for the best representational work

**हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

# अभिनंदन



देवधर मंडळाच्या कार्यकारिणीची सभा मंडळाचे उपाध्यक्ष श्री. पु. गो. देवधर यांच्या घरी आयोजित करण्यात आली होती. मंडळाच्या प्रथेप्रमाणे अध्यक्ष श्री. सुरेश देवधर व सचिव श्रीमती सरिता देवधर यांनी श्री. पु. गो. देवधर यांचे आभार मानले.

# विविध ठिकाणी मिळणारे आंब्यांचे प्रकार




पायरी, कोकण (महाराष्ट्र)



किलिचुंदन, केरळ



लक्ष्मणभोग, प. बंगाल




वनराज, गुजराथ



हापूस, रत्नागिरी



तोतापुरी, कर्नाटक



तैवान



बँकॉक, थायलंड



केंट, इंग्लंड

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.